# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर – ४१६ ००४

परिपत्रक क्र. कोविमं/शाखा माध्यमिक परीक्षा/ ५९५ दिनांक : १३.०६.२०१९

विषय : जुलै–ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखाबाबत.

संदर्भ : क्र. रा.मं./परीक्षा–३/३०७२, दिनांक १२.०६.२०१९.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, **जुलै–ऑगस्ट २०१९** मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या तारखा खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळांमार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे सादर करावयाच्या तारखा. | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा. | माध्यमिक शाळांनी शुल्कभरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या वितरणकेंद्राकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| (अ) नियमित शुल्कासह | शुक्रवार दि. १४/०६/२०१९ ते सोमवार दि. २४/०६/२०१९ | शुक्रवार दि. २८ /०६/२०१९ ते सोमवार दि. ०१/०७/२०१९ | मंगळवार दि. ०२/०७/२०१९ |
| (ब) विलंब शुल्कासह | मंगळवार दि. २५/०६/ २०१९ ते गुरुवार दि. २७/०६/२०१९ | | |

**तरी सदर परीक्षेची आवेदनपत्रे खालील संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावीत.**

**संकेतस्थळ – www.mahahsscboard.maharashtra.gov.in**

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे आपल्या शाळांमार्फ त भरण्यात यावीत. सर्व शाळांतील मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, ऑनलाईन आवेदनपत्रे भरणेसाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१ श्रेणी सुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यासाठी जुलै–ऑगस्ट २०१९ व मार्च–२०२० अशा दोन संधी उपलब्ध राहतील.

२ ऑनलाईन आवेदनपत्र भरताना मार्च २०१९ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

३ पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियाच्या VIRTUAL ACCOUNT द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करून चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

४ मुंबई, नागपूर व लातूर विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क एच.डी.एफ.सी.(H.D.F.C. BANK) बँकेत VIRTUAL ACCOUNT द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात .

५ अमरावती ,नाशिक व कोकण विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क गतवर्षीप्रमाणे ॲक्सिस बँक ( AXIS ) बँकेत VIRTUAL ACCOUNT द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

६ नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

७ आवेदनपत्रासोबत नियमित/विलंब शुल्क याचा उल्लेख चलनामध्ये करण्यात यावा.

८ . आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देणेत येणार नाही .

९ इ. १० वी चा अभ्यासक्रम सन २०१८-१९ पासून पुर्नरचित केलेला असल्याने पुर्नपरिक्षार्थ्यांसाठी फेब्रु./मार्च २०१९ परीक्षेची अंतीम संधी होती. त्यामुळे पुर्नपरिक्षार्थ्यांसाठी जुना अभ्यासक्रम वेळापत्रक जुलै-ऑगस्ट २०१९ परीक्षेपासून तयार करण्यात येणार नाही. त्यानुसार पुर्नपरिक्षार्थ्यांनी नवीन अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याकरिता आवश्यक सुचना सर्व शाळा / विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

प्रति,

१) मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, सातारा / सांगली / कोल्हापूर.

२) शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हापरिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर.

३ ) प्रत माहितीस्तव : मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

**वितरण केंद्र प्रतिनिधींनी नियमित व विलंब शुल्कान्वये जमा झालेली विद्यार्थ्यांच्या याद्या, चलने गुणपत्रिकेच्या छायाप्रती असल्याशिवाय स्विकारु नयेत व स्विकारलेले साहित्य गुरुवार दिनांक ०४.०७.२०१९ रोजी विभागीय मंडळाकडे जमा करावीत.**